डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
दापोली.

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी.४१५७११.

जा.क्र./मसंकें/प्रअपां/प्र.सहा./७८/ / २०२३ दिनांक 17.02.2023

जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत पांगारी विभागामध्ये ०१ एप्रील २०२३ ते २८ फेब्रुवारी २०२४ या अकरा महीने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ३ स्वतंत्र प्रक्षेत्र सहाय्यक नेमणे आवश्यक आहे. प्रक्षेत्र सहाय्यकाने प्रक्षेत्रावरील, प्रक्षेत्र प्रमुखांनी सांगितल्या प्रमाणे दैनंदीन गरजेची कामे कंत्राटी पध्दतीने दिनांक ०१/०४/२०२३ ते २८/०२/२०२४ या कालावधी मध्ये मजुरांकडून करून घ्यावयाची आहेत. या कामासाठी प्रती महिना ठेका मजुरीचे दर नमुद करण्यात यावे. अर्ज या कार्यालयाने तयार केलेल्या नमुना फॉर्म मध्ये भरलेला असावा. अर्जासोबत संमतीपत्र व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती स्वाक्षांकीत करून जोडणे गरजेचे आहे.

तरी प्रक्षेत्रावरील कामे करून घेण्यासाठी कृषी पदविका/कृषि , उद्यानविद्या, वनशास्त्र पदवी प्रमाणपत्र धारक इच्छुक कंत्राटी अर्ज दिनांक **08.03.2023** पर्यंत या कार्यालयास पोहचेल असे पाठवावे. लखोटयावर 'प्रक्षेत्र सहाय्यक' पदासाठी ठेका कामाचा अर्ज असे लिहून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (पांगारी विभाग) ता. दापोली जि. रत्नागिरी या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठवावे.

अ. क्र.	योजनेचे नाव	पदनाम	पदसंख्या	कर्तव्याचे ठिकाण
१.	मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, " पांगारी विभाग"	"प्रक्षेत्र सहाय्यक" ११ महिन्यासाठी ०१/०४/२०२३ ते २८/०२/२०२४	३	" पांगारी विभाग" मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.

कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक पदासाठी आवश्यक अर्हता :-

- उमेदवार हा कृषी पदविका अथवा कृषि , उद्यानविद्या, वनशास्त्र कोणत्याही शाखेतील पदवीधर असावा. उच्चतम शैक्षणीक अर्हता धारक असल्यास किमाण पदविधर समजण्यात येईल.
- MS-CIT संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- कृषि पदविका/कृषि , उद्यानविद्या, वनशास्त्र पदवी धारक उमेदवाराचे उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठीय प्रक्षेत्रावरील 'प्रक्षेत्र सहाय्यक' कामकाजाचा अनुभव असावा. असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

उपरोक्त पद भरण्यासाठी नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत

- उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादाही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी 18 ते 38 वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी 18 ते 42 वर्षे अशी राहिल.
- सदर कामे सन 2023–24 या कालावधी करीता राहिल. कार्यालयीन कामकाजाचे स्वरुप पाहून सदर कामे चालू ठेवण्यात येतील अथवा कोणतेही कारण न देता केव्हा ही माप्त केला जाईल.
- सदरची कंत्राटी नियुक्ती कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सदरची कंत्राटी नियुक्ती रदद करण्यात येईल.
- संबंधित उमेदवाराला कंत्राटी नियुक्ती संपण्यापूर्वी सदर कंत्राटी नियुक्ती रद्द करावयाची असल्यास त्याने तशी 1 महिना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना भरणे आवश्यक आहे. आणि अशा व्यक्तीची कंत्राटी नियुक्ती भविष्यात घेतली जाणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी–5443/90 दि.02.09.2019 निर्णयाच्या अनुषंगाने या कंत्राटी नियुक्ती कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
- कंत्राटीनियुक्ती पध्दतीच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रुपये 100/–किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर लिहून देऊन सादर करावे.
- कामाची आदायगी महिन्यातून एक वेळी करणेत येईल. त्यासाठी केलेल्या कामाचे बील सादर करावे लागेल. सदर रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- वरील प्रमाणे काम करणेचे प्रति महादर नमूद करावे.
- अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास बीलांची आदायगी होणार नाही व आपले नाव पुढील कामाच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- वरीलप्रमाणे नमुद केलेली सर्व कामे माहे एप्रील 2023 ते फेबुवारी 2024 पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत करावयाचे आहेत.
- या बाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधनकेंद्र, वाकवली यांनी राखून ठेवलेलेआहेत.
- सदरचे कंत्राटी काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्ही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे.
- उपरोक्त कंत्राटी पदाची मुलाखती घेवून नियुक्ती देण्यात येणार असून मुलाखतीची तारीख आपणांस कळविण्यात येईल.
- पोस्ट टपाल वाटपामधील उशिराबाबत हे कार्यालय जबाबदार असणार नाही.
- प्रक्षेत्रावर काम करीत असताना दुखापत अथवा अन्य अपघात झाल्यास या कार्यालयाकडून कोणतीही भरपाई अथवा विमा कवच मिळणार नाही.
- आदेश प्राप्त झाले पासून १० दिवसांचे आत हजर होणे आवश्यक आहे अन्यथा आदेश रदद करण्यात येतील.

17/2/2023

ठिकाण :–वाकवली.
दिनांक :– 17/02/2023

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता.दापोली, जि.रत्नागिरी

अर्जाचा नमुना

१) अर्जदाराचे नाव	:—	
२) ई—मेल	:—	
३) पदाचे नाव	:—	
४) प्रकल्पाचे नाव	:—	
५) पत्रव्यवहारासाठी पत्ता	:—	
६) जन्म तारीख	:—	
७) दिनांक .....रोजी वय	:—	.....वर्ष.....महिने.....दिवस
८) धर्म/जात	:—	
९) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक	:—	
१०) शैक्षणीक अर्हता	:—	

परीक्षा	बोर्ड/महाविद्यालयाचे/शाळेचे नाव	उत्तीर्ण वर्ष	टक्केवारी

११ अनुभव:—

पदाचे नाव	कालावधी		कामाचे स्वरूप	कामाचे ठिकाण
	पासून	पर्यंत		

१२ इतर (Article/Abstract etc.):—

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आ
तसेच सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी पात्र नसेन याची म
जाणीव आहे.

दिनांक:—

ठिकाण:—

उमेदवाराची सही

प्रपत्र–अ

स्वंघोषणापत्र

मी.....श्री.....
यांचा मुलगा/मुलगी वय..... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास).....
व्यवसाय.....राहणार..... याद्वारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनूसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायाद्यूसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:–..... अर्जदाराची सही.....

दिनांक:–..... अर्जदाराचे नाव:– .....

प्रपत्र–ब

स्वयं–साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

मी.....श्री.....

यांचा मुलगा/मुलगी वय.....वर्ष, आधार क्रमांक (असल्यास).....

व्यवसाय.....राहणार..... याद्वारे घोषित करतो/करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खेटया असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायाद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:–..... अर्जदाराची सही.....

दिनांक:–..... अर्जदाराचे नाव:– .....